# शिवतीर्थावरून..! भाग ३




*शिवतीर्थ -* ***निश्चयाचा महामेरू, बहुत जनांशी आधारू. अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी.*** *- समर्थ रामदास स्वामी.*

## डॉ. अतुल काजी

परवा शिवाजी पार्कला प्रभात फेरी मारतांना वीणा उद्यान गणेश मंदिरात गणेशाचे दर्शन घ्यायला गेली. मी गेलो नाही. देवळाच्या पाठीमागे असलेल्या बांकावर बसायला गेलो तेव्हड्यात, *'तो बांक ओला आहे, येथे बसा...'* तेथे बसलेल्या घाऱ्या डोळ्यांच्या बाईने मला सांगितले. तिने ओळख करून दिली, मी पूर्णिमा म्हात्रे. येथेच वागळ्यांच्या ज्या तीन बिल्डींग्स आहेत तेथे रहाते. मग, मी माझी ओळख करून दिली व म्हणालो, मग तुम्ही विद्या दामले-लोखंडेला निश्चित ओळखत असाल. *'अरे, ती तर माझी खास मैत्रीण व शेजारीण...'* आम्ही एकत्र वाढलो वगैरे वगैरे सांगून म्हात्रेबाईंना मी विचारले, *'अहो, तुमच्या बाजूला अतुल काजी रहात होता नां. तो आता कुठे रहातो..?'* कारण, अतुलची जुने बिल्डिंग पाडून तेथे टॉवर होतोय म्हणून विचारले, म्हात्रेबाईंना त्या परिसरातील सर्वांची इत्यंभूत माहिती होती. नव्हे, त्या शिवाजी पार्कचा चालता बोलता इतिहासच होत्या. झालं, अतुलला मी आलोय याचा निश्चित पत्ता लागेल याची मला खात्री पटली. आणि तसेच झाले. अतुलचा दुसऱ्या दिवशी मला फोन आला. *"जयु, जायच्या आधी भेटून जा. मी समुद्राजवळ 'सिल्व्हरीन' येथे दुसऱ्या मजल्यावर रहातोय. तुझी वाट पाहतो..."*



***१) प्रशस्त दिवाणखाण्यात अतुल व पत्नी स्वर्णा... २) अतुल व मी... ३) अतुलची प्रेक्षणीय पेंटिंग्स...***

विद्या लोखंडेचं नांव निघालं म्हणून लिहितो. गिरगांव पंचे डेपोच्या बाजूला जे शाहाडे आठवले पातळवाल्यांचं दुकान होतं ते शाहाडे आमचे घर मालक, 'शाहाडे सदन' हे  नांव आहे. आणि आमच्या बाजूचं (शिवाजी पार्कला डॉ. राऊत रोडवर) घर हे विद्या लोखंडेचं, 'अनंताश्रम' हे त्याचं नांव होतं. विद्या ही अत्यंत कर्तबगार व व्यासायिक वृत्तीची होती. शिवाजी पार्कला जुनं घर पाडून सहा मजल्यांचं नव्याने सर्व प्रथम उत्तम घर बांधलं गेलं ते विद्या लोखंडेचं. 'अथर्व' हे त्याचं नांव. त्यानंतर शिवाजी पार्कचा सर्व कायापालट पूर्णपणे बदलला. कधी नव्हे ते प्रचंड टॉवर्स, प्रचंड लोकवस्ती, प्रचंड घाण आणि प्रचंड आवाजाबरोबर सर्व  प्रकारचे पोल्युशन वाढले. थोडक्यात, शिवाजी पार्कची खरी 'शान' पार धुळीला मिळाली. निसर्ग दृष्टी अथवा लँडस्केप हा प्रकार नाहीसा झाला. मोडक इंजिनियर यांनी साऱ्या महाराष्ट्रात बघायला मिळणार नाही अशी वसविलेली देखणी, सुंदर व उच्चभ्रू लोकांची वसाहत पार नष्ट झाली. असं माझं स्पष्ट मत. आज मोडक इंजिनियर हयात नाहीत म्हणून फार फार बरं. नशिबाने लँडमार्क म्हणून त्यांचा आलिशान बंगला ही नामनिशाणी त्या जागी आहे ही देवाचीच कृपा होय. सुप्रसिद्ध कवयित्री, लेखिका, अभ्यासक व समाजसेवक उषाताई मेहता त्या घरात रहातात. त्यांची झालेली परवाची आमची भेट ही मला ऐतिहासिक वाटली. असो.




***१) वागळयांच्या तीन बिल्डिंग पैकी एक 'दीनानाथ गुरु भवन' जेथे पेन्टहाऊसमध्ये अतुल रहात होता ते घर... २) आता तेथे नव्याने होणारे २२ मजली 'श्री चामुंडी हाईट्स' टॉवर जेथे ८व्या मजल्यावर अतुलची जागा आहे... ३) दरम्यान समुद्राजवळ 'सिल्व्हरीन' बिल्डिंगमध्ये' अतुलला तात्पुरती मिळालेली जागा...***

तसं पाहिलं तर अतुल हा मला बालमोहन शाळेत सिनियर होता. माझ्या मोठ्या भावाचा मित्र. आमच्या बालमोहन विद्यामंदिर शाळेचा अतुल हा अत्यंत हुशार विद्यार्थी होता. शाळेत दोनदां स्कॉलरशिप मिळविलेला विद्यार्थी. जुन्या (78 rpm च्या रेकॉर्डस्) दुर्मिळ हिंदी गाण्यांचा तो शौकीन व माझ्याप्रमाणे 78 rpm च्या रेकॉर्ड्सचा प्रचंड सांठा असलेला तोही संग्राहक होता. म्हणून दैवकृपेने त्याचे व माझे सूर जुळले होते. त्यामुळे शिवाय तेथे लिफ्ट-एलिव्हेटर असल्याने अतुल जो आज तब्बेतीमुळे खाली उतरत नाही तो नियमित खाली उतरू शकेल. हे अतुलने आनंद व्यक्त करून किती महत्वाचं असेल ते सांगितलं. अतुलची देहद्रुष्टी धिप्पाड व सहाफुटी होती. दारासिंग डोळयासमोर आणा. परंतु, दिसायला सुंदर, प्रेमळ

स्वभाव व बोलणं सौम्य असे. आमच्या घरी हिंदी गाण्यांचे रेकॉर्डिंग करायला आला की, लहानपणी माझा मुलगा सलील त्याला घाबरून असे. परंतु, अतुल हा सलीलसाठी चॉकोलेट्स आणायचा म्हणून तो आला की सलील खुष असे.

अतुल पुढे UDCT मधून फर्स्ट क्लास मधून केमिकल इंजिनियर झाला व त्यात त्याने डॉक्टरेट मिळविली. UDCTलाच तो प्रोफेसर होता व पुढे हिंदुस्तान लिव्हर मध्ये डिरेक्टर म्हणून नोकरीला लागला. खाण्यापिण्याच्या बाबतीत अतुल प्रचंड शौकिन व खवैय्या होता. मुंबईतील उत्तम खाण्याच्या ठराविक जागा अतुलला माहित होत्या. मात्र तो एकटा कधीही खायला जात नसे. नेहमी मित्र मंडळींना घेऊन तो मौज करीत असे. मला आठवतंय, कोहिनूर सिनेमासमोरील लस्सीचे खास दुकान अतुलचे आवडते होते. एक ग्लास लस्सी आम्हाला पुरीशी असे. तर अतुल चक्क चार ग्लास मलईसह लस्सी एका दमात फस्त करीत असे. खाण्यापिण्याच्या प्रत्येक अड्ड्यावरील मालक हे अतुलचे खास मित्र झाले होते. तसंच, शिवाजी पार्कच्या समुद्रावरील भेळ पुरीवाला, पाणीपुरीवाला व कुल्फीवाला यांनाही अतुल चुकवीत नसे. एव्हढंच काय, भेळपुरीवाल्याच्या लग्नालाही अतुल गेला होता. इतकी त्याची सर्वांशी गट्टी होती.





***१) सुरश्री केसरबाई केरकर यांना मिळालेले गौरवपर मानसन्मान... २) शिवाजी पार्कला जेथे केसरबाई रहात होत्या तो 'पराग' बंगला... ३) सुरश्री केसरबाई केरकर...***

आमच्या ठराविक मित्रमंडळींमध्ये दर संध्याकाळी शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर गप्पा मारायला अतुल येत असे. त्या मित्र अंडाळीत मी वयाने सर्वात लहान होतो. परंतु, मला तेथे थारा दिला होता. अतुल आला की, आम्ही सर्व खुषीत असायचो. कारण, अतुल हा आमच्या सर्वांची नुसती करमणूकच करीत नसे तर, त्याला बौद्धिक माहितीची व विनोदी छटा असायची. त्यातून अतुलची स्मरणशक्ती अफाट होती.

वक्तव्य व मधुर वाणी वाखाणण्यासारखी होती. थोडक्यात, Atul was really a fun, a treat to us. एक दिवस तो संध्याकाळी आला नाही तर आम्हला चुकल्यासारखं वाटत असे, काळजी वाटत होती. अतुलच्या मोठेपणा असा होता की, तो नोकरी व्यवसायात इतका उच्च पदावर असून त्याला त्याचा गर्व नव्हता. लहान मोठा हा भेदभाव नसे. हे अतुलचे वैशिष्ट्य. मंडळी, अतुलचे आई-वडील शिवाजी पार्कचे निष्णात डॉक्टर होते. आणि जागतिक कीर्तीच्या गायिका सुरश्री केसरबाई केरकर या अतुलच्या आजी..! म्हणजे, मित्र या नात्याने खऱ्या अर्थी आम्हीच नशीबवान होतो असं म्हणणं योग्य ठरेल. असो. सुरश्री केसबाई केरकर या डॉ. राऊत रोडवर पूर्वीच्या बंबखान्यासमोर 'पराग' या त्याच्या स्वतःच्या घरात दुसऱ्या मजल्यावर रहात होत्या. सुरुवातीला अतुल हा तेथे आई-वडिलांजवळ पहिल्या मजल्यावर रहात असे. नंतर अतुल शिवाजी पार्कसमोर वागळ्यांच्या तीन बिल्डिंगमधील 'दीनानाथ गुरु भवन'च्या पेन्टहाऊसमध्ये रहायला होता. आता 'दीनानाथ गुरु भवन' पाडून तेथे २२ माजली टॉवर होतोय. लवकरच ते पूर्ण होऊन अतुल तेथे ८व्या मजल्यावर रहायला जाईल. त्यामुळे शिवाजी पार्कचा उत्तम व्ह्यू त्याला दिसेल. अतुलसह त्याची सर्व भावंडे दिसायला सुंदर व अतिशय हुशार. ती सर्व आमच्या बालमोहन शाळेत होती. अतुल हा भावंडात मोठा व त्याची ईला नांवाची धाकटी बहीण ही माझी वर्ग मैत्रीण होती.






***१) एका खाज़गी कार्यक्रमात गातांना सुरश्री केसरबाई केरकर... २) पु.लं.च्या मध्यस्थीमुळे कलकत्त्याचे सुप्रसिद्ध शिल्पकार शर्वरी राय यांनी सुरश्रींचा देखणा पुतळा... ३) अतुलची आई सुमनताई व धाकटी बहीण ईला जी माझी बालमोहन शाळेत वर्ग मैत्रीण होती...***

साठच्या दशकात केसरबाईंनी हळूहळू जाहीर कार्यक्रमांत गाणं बंद केलं. त्यांनी फारशी गाणी रेकॉर्ड केली नाहीत, फोटो काढणंही त्यांना पसंत नव्हतं, पण शिल्पकार शर्वरी राय चौधरी यांना पु.लं.च्या मध्यस्थीमुळे केसरबाईंचा एक पुतळा तयार करण्याची संधी मिळाली. तू माझ्याशी गप्पा मारणार असशील आणि तुझी गाणी ऐकवणार असशील तरच मी पुतळ्यासाठी एवढा वेळ बसून राहीन अशी अट केसरबाईंनी पुलंना घातली होती. *"आमच्या नशिबातले ते भाग्यशाली दिवस"* अशा शब्दांत पुलंनी त्या दिवसांचं वर्णन केलं आहे.

ठरल्या प्रमाणे मी अतुलला भेटायला गेलो. त्याला पाहतांच मला आनंद झाला परंतु, वाईटही वाटलं. कारण, वजन घटल्यामुळे अतुल हा बारीक दिसला. अतुल म्हणजे, धष्टपुष्ट, धिप्पाड, प्रसन्न व्यक्तीमत्व. मध्यंतरी काळजी वाटणाऱ्या आलेल्या आजारपणामुळे तो बारीक व अशक्त दिसला. मात्र त्याच्या उत्साहात कांहीच फरक दिसला नाही. ही जमेची बाजू होती.

अतुलच्या आजी केसरबाई नेहमी गायनाचा रियाझ करतांना तेथे फक्त अतुलला बसण्याचीच परवानगी देत असत. अतुल तेव्हा वयाने खूप लहान होता. परंतु, अस्सल शास्त्रीय गाणं किंवा गायन म्हणजे काय चीज याची त्याला पूर्ण माहिती होती. त्यावेळी त्याच्या कानावर फक्त केसरबाईंचेच सूर पडल्याने अतुल म्हणतो, *"अरे जयु, मला लहानपणी शास्त्रीय संगीताचे फक्त उत्तम सुरच कानावर पडले आणि ते माझ्या आजीचे. त्यामुळे इतर गायकांचे सूर अथवा गाणी ऐकण्याचे धाडस मी आजतागायत केलं नाही. करावं लागलं नाही…"* खरंच अतुल हा भाग्यवान होता.

मंडळी, परवाच्या मुंबईतील आमच्या धांवत्या भेटीत माझे अनेक मित्र, गाण्यांचे-संग्राहक, फोटोग्राफर्स, पत्रकार, लेखक आमचा ६५ वर्ष जोपासलेला भारतीय चित्रपट सृष्टीचा १०० वर्षांचा (कधीही पाहायला न मिळणाऱ्या) दुर्मिळ छायाचित्रांचा प्रचंड संग्रह वेळात वेळ काढून शिवाजी पार्कच्या घरी पाहायला आले होते. त्याचे अतिशय कौतुक झाले, केले गेले व  त्यांच्यासह आम्हाला त्याचे समाधान लाभले. अतुलची तब्बेत खास नसूनही श्रम घेऊन तो संग्रह पहायला आला होता. याचे मला अप्रूप वाटले. अतुलने जेव्हा माझ्या शंभर वर्ष भारतीय सिनेमाच्या छायाचित्रांचा प्रचंड दुर्मिळ संग्रह पहिला तेव्हा सदीच्छा व्यक्त केली व म्हणाला, *"जयु, याचे मुंबईत प्रदर्शन भरायला हवे व Coffee Table Book प्रकाशित व्हायला पाहिजे…"* त्यावर मी अतुलला म्हणालो, *"अरे, तुझ्या तोंडात साखर पडो..!"* अतुलच्या घरी झालेल्या त्याच्या भेटीत मात्र अतुलने मला धारेवर घेतले व गंमतीने म्हणाला, *"च्यायला जयु. सारखं लता, लता, लता काय लावलंयस. लताशिवाय दुसरे कुणी गाणारे तुझ्या झोळीत नाहीत..?"* मग अतुलने कानन देवी, शमशाद, जोहराबाई, ललिता देऊळकर, गीता दत्त, सुरैय्या, सुलोचना चव्हाण-कदम, मीना कपूर, सुरेंद्र व जगजीत कौर, सुधा मल्होत्रा, सुमन कल्याणपूर, सैगल, पंकज मलिक, जगमोहन सुरसागर, हेमंत कुमार, रफी, तलत वगैरेंची यादी माझ्यापुढे त्यांच्या गाण्यांसह गाऊन पेश केलीत. विशेष म्हणजे, ती सर्व गाणी अतुलच्या आजही तोंडपाठ होती. सर्वच श्रवणीय होते. कधीही न ऐकलेले संगीतकार व त्यांची गाणी ऐकविली. अर्थात ती सर्व माझ्याकडे होती. नंतर अतुलने त्याच्याकडील जपून ठेवलेल्या कांही 78rpm च्या जुन्या दुर्मिळ रेकॉर्डस् Garrard Record Changerसह बाहेर आणल्या. ते पाहून मी आनंदाने चक्रावून गेलो होतो. कानन देवीच्या *'ऐ चांद छुपना जाना…'ने* जी सुरुवात झाली ती पंकज मलिकच्या *'आई बहार…'ने* थांबली. तीन तास कसे निघून गेले ते कळलेच नाही. शेवटी अतुलने लताचं 'परिचय'

सिनेमातील शैलेशने संगीत दिलेलं सर्वोत्तम गाणं *'जलके दिल खाक हुआ...'* लावलं, हे ऐकून मी अतुलला म्हटलं, *'ये न हुवी बात. आपने अखेर लताकोही याद किया...'* अरे जयु, *'After all Lata is Lata..!'*



***१) अतुलचे डॉक्टर आई वडील. वडील हे नामवंत पॅथलॉजिस्ट होते... २-३) सुरश्री केसरबाई केरकर... ४) प्रेसिडेंट झाकीर हुसेन यांचेकडून पदमभूषण पारितोषिक स्विकारतांना...***



***१) केसरबाईंचे गुरु अल्लादिया खान... २) नासाच्या व्हॉयेजरने अंतराळात पाठविलेली The Sound of Earth नांवाची गोल्डन डिस्क. ज्यात केसरबाईंची 'तुम जात कहाँ...' ही भैरवी आहे...***
***३) प्रेसिडेंट राजेंद्र प्रसाद यांचे कडून संगीत नाटक अकॅडेमी अवॉर्ड स्विकारतांना केसरबाई...***

अमेरिकेच्या नासानी-व्हॉयेजरने बऱ्याच वर्ष्यापूर्वी जगातील प्रत्येक देशातील एक सर्वोत्तम कलाकाराची कला अंतराळात गोल्डन डिस्कमधून पाठविली होती. त्याचा उद्देश असा होता की, ज्या प्लॅनेटवरील मनुष्यप्राण्याला ती डिस्क मिळेल त्यांना पृथ्वीवरील निरनिराळ्या क्षेत्रातील उत्तोमोत्तम कला पाहायला व ऐकायला मिळतील. मंडळी, त्या सोन्याच्या तबकडीत भारतामधून सुरश्री केसरबाई केरकरांची 'तुम जात कहाँ...' ही अप्रतीम भैरवी होती. नासाला ही भैरवी मिळायला खूप त्रास पडला होता. परंतु, सर्वत्र शोधाशोध करून शेवटी न्यू यॉर्कला मॅनहॅटनमध्ये असलेल्या एका गुजराती माणसाच्या ग्रोसरीच्या दुकानात बेसमेंट मध्ये केसरबाई केरकरांची 'तुम जात कहाँ...' या भैरवीच्या एक नव्हे तर तीन कोऱ्या 78rpm च्या रेकॉर्डस् मिळाल्या होत्या. हे सर्व अद्भुत होते व ही घटना ऐतिहासिक होती. महत्वाचं म्हणजे, कुठेही ती रेकॉर्ड मिळत नाही म्हणून नासाने त्यांचे प्रयत्न अर्धवट सोडून दिले नव्हते. अखेर

नासाच्या एका अमेरिकन बाईला त्याचा शोध लागला होता..! तसेच, पूर्वी वागळे यांच्या शेजारचे घर अतुलच्या आजीचे होते. कोल्हापूरहून जेव्हा प्रथम मास्टर विनायक मुंबईला मंगेशकर भावंडांना घेऊन आले. ते या शिवाजी पार्कला केसरबाईंच्या घरी कांही महिने राहायला आले होते. त्यावेळी कांही दिवस ही भावंडे बालमोहन शाळेत जात होती. ही सत्यकथा कुणाला माहित आहे..? असो.



***१) अतुल व स्वर्णाने भेट मला खास दिलेले दुर्मिळ Itching Art Print. शीर्षक: View of the Inside Gate at bangalore with guard room... २-३) नवोदित कलाकारांचे उत्कृष्ट ड्रॉईंग व पेंटिंग...***

आज अतुलकडे जुन्या दुर्मिळ गाण्यांसह अनेकोत्तम पेंटिंग्सचा संग्रह आहे जो एखाद्या म्युझियम मध्येही नसेल. सध्या जेथे तात्पुरता रहातो, ती जागा प्रशस्त असून पूर्ण दुसरा मजला त्याला मिळाला आहे. अतुल व त्याच्या पत्नीने स्वर्णाने माझं उत्तम स्वागत करून जो पाहुणचार घेतला त्याला तोड नव्हती. एक आठवणवजा खास भेट म्हणून अतुल व स्वर्णाने मला त्यांच्या संग्रहातील एक उत्कृष्ट दुर्मिळ इचिंग-प्रिंट मला दिली. हा त्यांचा दिलदारपणा व औदार्य मला नव्याने नव्हता. अतुल व स्वर्णाशी गप्पा मारतांना त्या संपू नयेत ही भावना मनी होती. नाईलाजाने व जड अंतःकरणांनी त्यांचा निरोप घ्यावा लागला. तोही पुनः येण्यासाठीच. तसेच, माझ्या दुर्मिळ छायाचित्रांच्या संग्रहात भर म्हणून सुरश्री केसरबाईंची अनेक दुर्मिळ छायाचित्रें व त्यांची दुर्मिळ भजनं-गाणी भेट दिलीत. मिळालेलं हे सर्व 'धन' मला 'अनमोल' व अविस्मरणीय होतं. ही माझी 'मम सुखाची ठेव' व 'श्रीमंती' होती..!

योगयायोग असा की, अतुल सध्या जेथे 'सिल्व्हरीन' या घरात रहातो त्याच्या मागचं घर आहे संगीतकार सी. रामचंद्र यांचं. त्यानंतर आहे आचार्य अत्रे यांचं. आणि नंतर शिवाजी पार्कचा समुद्र. जो सध्या अत्यंत वाईट परिस्थितीत असून जेथे पूर्वीसारखा किनारा नाहीये. तेथे मुलांना खेळायला वाळू नाहीये, खायला भेळपुरी, पाणीपुरी व कुल्फी नाहीये. ही खेदजनक बाब होय.

मंडळी, मी खात्रीने सांगतो की, आज या प्रदूषणात शिवाजी पार्कचा जो हरवलेला इतिहास आहे तो तुम्हाला जर परत मिळवायचा असेल, तर अजूनही जुनी रत्नें शिल्लक राहिली आहेत त्याचा शोध घ्यावा. तुम्हाला *'हरवले ते गवसल्याचा'* आनंद मिळेल. त्या दूषित वातावरणात 'प्राणवायू' मिळेल. तुम्ही

शतायुषी व्हाल याची मला खात्री आहे. आणि जर चुकून अतुल काजीला भेटलात तर, नुसत्या स्मरणरंजनाचा आनंदच नव्हे तर, साऱ्या शिवाजी पार्कचा मूळ इतिहास तुम्ही प्रत्यक्ष अनुभवाल. हो, वेळ अजूनही गेलेली नाहीये. मी हे अमेरिकेत बसून सांगतोय, हे त्रिवार सत्य आहे..!

केसरबाईंच्या भैरवीचे सूर पोचले अंतराळात 20 अब्ज किमी दूर:
https://www.bbc.com/marathi/india-41675496

---

अतुलने मला जी कांही अप्रतिम दुर्मिळ गाणी ऐकविली ती येथे आपण ऐकावी.
स्मरणरंजनाचा आस्वाद मिळाल्याचा आनंद आपण उपभोगाल. त्याचे श्रेय मात्र अतुलला द्यावे.

1) Voyager's Golden Record: Jaat Kahan Ho by Surshri Kesar Bai Kerkar:
https://www.youtube.com/watch?v=Qyj8QF5-6Fs

2) Lalarukh - Hai Kali Kali Ke Lab Par - Mohd.Rafi:

https://www.youtube.com/watch?v=Gr5eevEgblw

3) Hai yeh wohi aasmaan..Talat_Asha Bhosle_Nashad_Char Chand1953:

https://www.youtube.com/watch?v=-A4M9Mn9oHg

4) Kanan Devi-Jawab-Aye Chand Chup Na Jana:

https://www.youtube.com/watch?v=G2-GkUUwjsg

5) Jalke Dil Khaak Hua - Lata Mangeshkar - Film - Parichay (1954):

https://www.youtube.com/watch?v=BJqU9SDlM_w

6) Jaal 1952 Yeh Raat Ye Chandani Phil Kahan - Lata - Hemant
https://www.youtube.com/watch?v=PAOoA_EbASY

---

**(क्रमशः)**

**- जयंत कुळकर्णी**